श्री. डॉ. विनोद भागोराव भिसे,आरोग्य पर्यवेक्षक, पंचायत समिती अकोले,यांना पदावरुन तात्पुरते दुर करणेबाबत.

अहिल्यानगर जिल्हा परिषद
आरोग्य विभाग,
जिल्हा परिषद आदेश क्र. आरोग्य/कार्या2/आस्था3/ 305 /2025,
दिनांक 30/04/2025

वाचा :- 1. महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील )नियम 1964 चे नियम 3
2. मौजे राजुर,ता. अकोले येथे कावीळ साथरोग उद्रेक उपाययोजना बाबत भेट दि.25/04/2025
3. जिल्हा आरोग्य अधिकारी. यांनी साथरोग नियंत्रणाबाबत दि. 25 व 28 रोजी दिलेल्या सुचना
4. अति. जिल्हा आरोग्य अधिकारी,यांनी दि. 29 रोजी प्रत्यक्ष व दुरध्वनीव्दारे दिलेल्या सुचना

ज्या अर्थी श्री. डॉ. विनोद भागोराव भिसे, आरोग्य पर्यवेक्षक,पंचायत समिती अकोले येथे कार्यरत असताना प्राथमिक आरोग्य केंद्रांना भेटी देवून साथरोग नियंत्रण कार्यक्रम व इतर आरोग्य विषयक कार्यक्रम पर्यवेक्षकीय कामकाज करणे आवश्यक आहे. राजुर गावामध्ये कावीळ आजाराची साथ पसरलेली असताना पर्यवेक्षकीय कामकाजात तृटी असलेमुळे रुग्णसंख्या वाढत असलेचे कळविले नाही. तसेच साथरोग नियंत्रणाबाबत संदर्भ क्र 2 ते 3 नुसार श्री. भिसे यांना वेळोवेळी सुचना देवूनही सदर परिस्थितीचे गांभीर्य लक्षात न घेता श्री. भिसे यांनी याकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष करुन जिल्हा आरोग्य अधिकारी,अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे भेटी दरम्यान अनुपस्थित होते. सदर साथीबाबत अहवाल सादरीकरणाबावत आपणास वारंवार सुचना देवूनही आपण अहवाल सादर केलेला नाही.

ज्याअर्थी श्री. डॉ. विनोद भागोराव भिसे, आरोग्य पर्यवेक्षक हे जिल्हा परिषद कर्मचारी असून त्यांनी सदैव निरपवाद,सचोटीने व कर्तव्यपरायण असणे आवश्यक आहे. परंतु त्यांनी आपले नियमीत कामकाज व साथरोग परिस्थितीमध्ये अक्षम्य दुर्लक्ष व हलगर्जीपणा करुन वरिष्ठांचे आदेशाचे पालन न करता गैरवर्तन केल्यामुळे त्यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम 1967 चे नियम 3 चा भंग केलेला आहे.

त्याअर्थी महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील )नियम 1964 चे नियम 3 मध्ये दिलेल्या तरतुदीस अधिन राहुन मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद अहिल्यानगर या आदेशाव्दारे उक्त श्री. डॉ. विनोद भागोराव भिसे,आरोग्य पर्यवेक्षक,पंचायत समिती अकोले,यांना सदरचा आदेश बजाविलेल्या दिनांकापासून जिल्हा परिषद सेवेतून निलंबीत करीत आहे. आणखी असाही आदेश देणेत येत आहे की,हा आदेश आमलांत राहील तेवढया कालावधीत श्री. डॉ. विनोद भागोराव भिसे यांचे मुख्यालय पंचायत समिती राहाता जिल्हा अहिल्यानगर येथे राहील. श्री. डॉ. विनोद भागोराव भिसे यांना गटविकास अधिकारी पंचायत समिती राहाता यांच्या पुर्वपरवानगी शिवाय मुख्यालय सोडता येणार नाही.

श्री. डॉ. विनोद भागोराव भिसे,आरोग्य पर्यवेक्षक,पंचायत समिती अकोले यांना महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन,बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम 1981 मधील नियम 68 च्या तरतुदीनुसार निलंबन भत्ता व पुरक भत्ते देण्यात यावेत. निलंबनाच्या कालावधीत श्री. डॉ. विनोद भागोराव भिसे,आरोग्य पर्यवेक्षक,पंचायत समिती अकोले यांनी खाजगी नोकरी स्विकारु नये. त्यांनी तसे केल्यास ते दोषारोप त्यांचेवर ठेवण्यात येईल. तसेच ते निलंबन निर्वाह भत्ता गमविण्यास पात्र ठरतील. निलंबनाचे कालावधीत निलंबन निर्वाह भत्ता जेव्हा जेव्हा देण्यात येईल त्या त्या वेळी आपण खाजगी नोकरी स्विकारली नाही. अथवा कोणताही खाजगी धंदा वा व्यवसाय करत नाहीत अशा आशयाचे प्रमाणपत्र श्री. डॉ. विनोद भागोराव भिसे,आरोग्य पर्यवेक्षक,पंचायत समिती अकोले यांनी सादर करावे.

निलंबनाच्या कालावधीत श्री. डॉ. विनोद भागोराव भिसे,आरोग्य पर्यवेक्षक,यांना निर्वा भत्ते देणेबाबतची कार्यवाही तालुका आरोग्य अधिकारी,पंचायत समिती राहाता हे करतील. सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करणेत आला असून त्याचा संकेतांक 20250430100111 असा आहे.

Signed by
Ashish Mukundrao Yerekar
Date: 01-05-2025 07:52:50
(आशिष येरेकर,भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,
श्री. डॉ. विनोद भागोराव भिसे,आरोग्य पर्यवेक्षक
व्दारा व प्रत :-गटविकास अधिकारी,पंचायत समिती अकोले,जिल्हा अहिल्यानगर
प्रत:- मुख्य लेखा व वित्त अधिकारी,जिल्हा परिषद अहिल्यानगर
प्रत:- गटविकास अधिकारी,पंचायत समिती अकोले/ राहाता जिल्हा अहिल्यानगर
प्रत:-तालुका आरोग्य अधिकारी,पंचायत समिती अकोले/राहाता,जिल्हा अहिल्यानगर